

साहित्य प्रतिष्ठान

# शेवटचा खेळ


सादरकर्ते
प्राजक्त देशमुख
प्रकाशक व वितरक
ई-साहित्य प्रतिष्ठान
तंबू सजावट व मांडणी
लास्ट बेंच डीझाईन्स



# आज रात्री ७ वाजता
# नाशिक येथे



# लालनाक्या..

तसं हे पात्र कुणाला नविन नाही, माझ्यासाठी तर नाहीच नाही. काही लोकं 'रोज'निशी लिहतात तसं मीही 'कधी'निशी लिहतो. म्हणजे सुरु रोजनिशी म्हणुन केली पण कधी कधी लिहणं होतं म्हणुन ही पळवाट. तर त्यामधे मी असे प्रश्न स्वत:लाच विचारतो जे मला कुणी विचारु नये असं मला वाटतं किंवा ज्यापासुन मी पळतो. अशा प्रश्नांना उत्तर येतात आतल्या लालनाक्याकडुन...

‘सगळ्यांना हसवणारा कसा दु:खी आहे' वैगेरे ही भावनाही काही नवी नाही. पण असा हा लालनाक्या जेव्हा तुम्ही त्याच्या तंबुत डोकावतात तेव्हा तो ओशाळवाणा होउन उत्तर द्यायला लागतो. - ती उत्तरं म्हणजे ह्या कविता.

‘उत्तर देणं’ वेगळं आणि अचानक पकडल्या गेल्यामुळे ‘उत्तरं द्यावं लागणं’ वेगळं. असंच 'सगळं ठिक चालु आहे' असं भासवणा-या लालनाक्याला ही ‘द्यावी लागलेली उत्तरं’. खरं फक्त एकच की विदुषकाच्या कपड्याला कॉलर नसली तरी स्वाभिमान नक्की असतो आणि त्याहुन मोठं खरं म्हणजे पाणीदार डोळ्यांच्या लालनाक्याच्या पाणी डोळ्यांचे कारण.

© प्राजक्त देशमुख
नाशिक
संपर्क – ९९६०४६४४४४
ईमेल - deshmukh.praj@gmail.com



अर्पण "त्याच्या" पाणीदार डोळ्यांना....



# कॉलर



सर्कशीच्या पट्टेदार तंबुच्या
मध्यावर...
डोक्यातली तुमान उतरवुन
लालचुटूक नाक जमीनीवर भवऱ्यासारखे फिरवत
मधोमध रुसुन बसुन राहिला ‘तो’
रिकाम्या खुर्च्यांकडे बघत ...

ज्यांनी त्याला
सोडलं ल्हा.. ल्हा.. करणाऱ्या जंगली कुत्र्यांसोबत
सोडलं नखभरं लाल तुकड्यासाठी धरपडणाऱ्या जंगली
मित्रांसोबत....

ज्यांनी त्याला..
निमुळत्या तोंडाच्या तोफेत कोंडलं
एक तंगडी धरुन मगरभर पाण्यात सोडलं...

ज्यांनी
जादुची कांडी फिरवुन केले त्याचे तुकडे पाच
सुंदरीची लपुन पापी घेऊन म्हणाला ‘मी नाही हाच’...

ज्यांनी त्याला..
झुलत्या आकाशझुल्यावरुन टोचुन भिरकावलं खाली
आणि लादल्या खांद्यावर शेकडो लिटरच्या पखाली...

ज्यांनी त्याला..
केसाळ अस्वलाखाली लोटलं
काटेरी बॅटने ढुंगण धोपटलं (आलं हसु..?)..



असंच हसले होते धोधो...
खुर्च्यांवरचे बोळकेसुद्धा...

अश्या साऱ्या खोट्या-खऱ्यांसोबत
आपलाच 'खेळ' करणाऱ्यांसोबत
'खेळ' संपल्यावर....
'खेळी'मेळीने वागायचं?

'माझ्या ठिगळ कपड्यांना नसेल कॉलर
पण आत स्वाभिमान नक्कीच आहे'
असा विचार करत...
तो रिकाम्या खुर्च्या बघत बसला रुसून....

पण
लगेचच... उठून
त्यांचा 'खेळ करणाऱ्यांच्या खांद्यावर'
हात टाकून तो निघालासुद्धा...

त्याने मुठबंद केलेलं लाल नाक
परत चिकटवलं नाकावर ...

तेव्हा विचार केला त्यानं ...

"कॉलर नसल्या स्वाभिमानापेक्षा
खळगी उरलं पोट जास्त महत्वाचं..."

******





# उतारातला लालनाक्या




मी
चिडलो फडफडलो
ते
हसले खुसफुसले

मी
रडलो धडपडलो
ते
टाळ्यांनी गडगडले

मी
रुसलो मुसमुसलो
ते
हुर्रे गगनी भिडले

मी
चपळ आता सुरकुतलो
ते
अजुनही हसता खुसफुसता

******



# सत्य

(मॅनेजरचे कौतुक)
तु हसता
ह्या जगाने
हसणे ही शिकले नवे

तु रडता
नाकातुनही
कारंज थवे

तु जसा
शुभ्र केकावरली
चुटुकशी चेरी

तु जसा
हिरा
ह्या सर्कशीच्या
कोंदणावरी
...............
(लालनाक्या मनात)

हत्ती घोडे उंट ससे
अन
अस्वल सिंह वाघनखे

नाचतात
मग लोळतात
मग घोळतात घाण जरा

मी प्रेक्षकांना भुलवतो
जेव्हा मागे चालतो खरारा..

******









# फेस वॉश

खेळ संपल्यावर...

मारले काही पाणी-सपकारे
घासले चेहऱ्याचे रंग लाल पांढरे

वाफाळलेला आरसा
काखेत धरुन पुसला
चेहरा कोराकट्ट अन स्वच्छ
पण कानी लपला रंग दिसला
.
कानातला रंग
मॅनेजरच्या आवाजागत रेंगाळत होता...

"लोकहो,
मस्कऱ्याची मस्करीवर
खुप झाले हसु
सुरु 'खरा' खेळ आता
चला श्वास रोखुन बसु...!!!"

कानी दडला रंग
तोंडी सपकारे मारुन खोडत नाही
मस्कऱ्याची मस्करी 'खऱ्या खेळात' मोडत नाही..

(तरी नंतर तासभर...
मारले काही पाणी-सपकारे
मारले काही पाणी-सपकारे
मारले मारले....)

******





# अनाउंसमेंट

“आता चेंडुवर चालत येईल
चेंडु सहा फुटा एवढा...
येतोय बघा लालनाक्या
तुमचा माझा लाडका...”

तिने घोषित केले
आणि मी।।।

तसाच भ्रमिष्टागत निघालो
चालत चालत ...
मधोमध पोचल्यावर...
‘रिंगण्या’ने टोचल्यावर...

पडलो
सगळे हसले
‘अरे चेंडु विसरलो...आणतो...”म्हणत उड्या मारत
गेलो

परत हसले....
रिंगण्या मला टोचत होता
मी उगाच अन
लोक पोटभर हसत होते....

तिचे-तुमचा ‘माझा लाडका’
माझ्या डोक्यात घोळत होते..

******









# फुलगुच्छ

खेळात थोडं असं होतं कि,

तो देतो तिला गुच्छफुला
मग हवेत गिरक्या घेत घेतात झुला...
ती सुटते...झुल्यावरुन खाली...
खाली जाळीदार जमीन तिला झेली...

लोक हसताय...
ती काही बोलेना
हा मनवतोय
ती मानेच ना...

ती देते मला
त्याच्या फुलगुच्छ ..
त्याची फडफड
मग
मला गालगुच्चा..

मी फुगा धरुन हळवा
तंबुचे टोक धरतो...
अन
खेळ संपल्यावर
त्यांना परत एकत्र बघतो.....


गुच्छ आता सुकलाय
पण
अजुन फुलदाणीत सजलाय

खेळात असं होतं थोडं थोडं ...

******







# सिरिअस टॉक...

रिंग्याः
लाल्या सांग टपोरेसे नाक लाल कसे?
ठिगळाचा झगा अन हात आखुडसे...

लालनाक्या :
लाल नाक टपोरेसे सर्दीने केले...
बाबाने नाव घराला ‘हिमालय’ दिले

(हशा)

रिंग्या :
बुट फट्ट्कशे कमी फिर जरा....
नाकाचे कळाले झग्याचे बोल जरा....

लालनाक्या :
रोज झगा बदला हा कशाला पसारा
एकसंध शिवले आधी कापले चरारा

(हशा)

रिंग्या :
मला सांग लाल्या मान दुखते का तुझी?
तु दिडफुटी साल्या मी साडेपाच फुटी

लालनाक्या :
बाबा म्हणे.. ताट मान छाती काढ पुढे
जग बोलताना झुके अदबीने तुझ्यापुढे
(टाळ्या)

******







# फावल्यावेळा

त्याने मारली टपली
फावल्या वेळात..
जशी मारतो
तो खेळात...

त्यावरुन मोकळया तंबुत
आमचं जुपलं तुंबळ ..

खेळ सुरु असताना
रंगल्या चेहऱ्यामागे
लपवता येते टपलीची कळ

खेळ झाल्यानंतर
भोगल्या मस्करीची दिवसभर
सलत राहते झळ

******







# शिंक

शिंकल्यावरती एकदा पडले 'लाल्यातुन'
दोन लालनाके

एक चंद्रच्या उलट्या कोरीगत रडका
दुसरा चिमण्याशा डोळ्यांपर्यंत हासे

लाल्या स्तंभित हसला-हसला नाही बघु लागला थबकुन
तो हसतो त्याला कारण नाही, हा रडतो उगाच हमसुन

एक म्हणाला..
एक म्हणाला, फेक म्हणाला
कसले जिवन साले
कुणी घालते चाट
लागली वाट
खुळा तो थाट
बिनडोकी जीवन झाले..
हे हसती खो खो..
हसती धो धो..


मग मीही हसतो
त्याला कारण कसले ..











दोन म्हणाला..

दोन म्हणाला, कोण म्हणाला..
कोण म्हणतो फेका
हे जगणे किती अफाट
मी खुजा कधी विराट
फेका म्हणणारा माठ
अरे फेक म्हणतो लेका?
अश्रु आनंदी
पडे एकांती
हे अश्रु तर मोती बरं का..

मग लाल्या म्हणाला...

आवरा तोरा
आवरा नाकाचा शेंडा...
दुसऱ्यावर चिडणे परवडणे नाही
उगा रागाचा मिरवी झेंडा...

आवरा मोती
आवरा अश्रु एकांती
सवय बेगडी रडकी साली
आनंदाची झालर खोटी
.......................................

(संपल्या खेळानंतर असा एकांती
बडबडण्याचा छंद जडे
मला माहिती ह्या तंबु बाहेर
कित्येक 'लाले' हे असे पडे)



******



# हाक

त्याने दिलेले फुल तिने भिरकावलेले
भिरकावतांना तिचे ओठ थरथरले.....

आकाशझुला झुलायला ती
उंच उंच गेली
शर्थ केली लाल्याने
“थांब..!” हाक दिली

ती आणि गेली उंच
अन दाखवली जिभ..
झुलादोर उसवला
ती कोसळली जशी कोसळते विज.....

ती नाजुकशी निजलेली
अन बाजुला फुल फेकलेले
फुल बघताच लाल्याला दिसे
तिचे ओठ थरथरलेले....
---
(पंखपाकोळ्यांचे फुल
त्याला जपवत नाही
आता गुलाबाची लाली
त्याला हसवत नाही)

******





# मिरवणूक



आभाळात भिरकवा..
करोडो रंगीत चिंध्या
रंगीत इतक्या की सप्तरंगी इंद्रचापाची
आश्चर्याने वक्र व्हावी
अर्धगोल भिवई...

गर्दी करा इतकी
की पानगळीतसुध्दा पानांना
वाटावी पानगळ कमी...।।

इतके हर्षपेय वाटा की
त्या पेयातुन उडणा-या
फेणाच्या तुषारांनी
खुणवावं आभाळपुंजक्यांना

नाचा इतके
कि थिरकत्या पायांचा
हेवा वाटावा...
लहानग्यांच्या
हातातल्या खुळखुळयांना...।।

खदखदा इतके की
श्वासांनी मागावी सवलत
कारण हसायला आधी
हवेची व्हावी लागते शिरवणुक

जगा इतके की
प्रत्येक श्वासाची व्हावी
न संपणारी मिरवणुक...।।

हीच अंतीम इच्छा....
माझ्या अंत्ययात्रेला.............



# वाचकांचे अभिप्राय...

अरे तु जाम भारी लिहितों यार !
एक तर आधी वाटतं की असलं
आपल्याला सुचूच शकत नाही
अन कधी वाटतं असलं
आपल्याला का सुचत नाही ?
*I hate you boss !!*
*(An undercover fan)*

– **विनायक उजळांबे**



घशात कोरडा आवंढा येऊन गेला रे !

*Have you been a Joker any time in your life? How can you be so systematically biographic?*

हि असली एक्सप्रेशन्स मराठीत तुझ्या आधी कोणी लिहिली होती का रे???
ग्रेट लिहीलयस....
शुभेच्छा !

– **आल्हाद महाबळ**

Dude it's horrible.....

bosssssssssssssss

डोक्यात हंटर बसल्यासारख्या
झिणझिण्या आल्या वाचून

– **शंतनू चंद्रात्रे**

चरण स्पर्श नमस्कार !

D-A-N-D-W-A-T....
तुझा मेंदु आणि हृदय ह्यांचा
अचाट तालमेळ साधतोस बाबा
तू.... great, simply great !!!

– **सुप्रिया जाधव**

अंगावर काटा आला...

भन्नाट, अफाट, अप्रतिम...
सगळेच शब्द फिके आहेत या कवितांपुढे...
निःशब्द....

**- संचिता कारखानिस**




निःशब्द केलेस मित्रा !

**- मिलिंद लांजेवार**

Awesome !!!!!

विदारक सत्य

**- प्रितीश कुलकर्णी**

काय बोलायचं ?????????

आई गगगगग...... सुंदर
संपुर्ण धागा अतिशय
हृदयस्पर्शी.....!!!!

एका वेगळ्या जगाची ऑळख.....
तुझ्या प्रतिभेबद्दल काय बोलावे ?

**- मनिषा नाईक**

कथा आणि व्यथा एका लालनाक्याची नव्हे.... लोकांच्या हास्यासाठी आपले खरे अश्रु खोटे असल्याचे भासवणा-या प्रत्येकाची..!

**- अभिषेक सामंत**

कानाखाली आवाज निघाला यार !!!!

**-सचिन पावसकर**




मी आज पाहिला धागा...खुप उशिरा
पाहिला...खुप उशिरा वाचला...
एकेक कविता म्हणजे चित्रपट आहे...
अख्खं चित्र नजरेसमोर तयार करते आणि
छोट्या छोट्या वाटणा-या गोष्टीत पण
इतकी संवेदनशीलता ???
या कविता थक्क करुन जातात...
निव्वळ निव्वळ अप्रतिम...
Speechless... खूप अफाट, अचाट

**- कविता मोकाशी**

लालनाक्या पुराण !
यार भन्नाट लिहिलयसं....!

एक एक ओळ वाचताना अंगावर
हजारो शहारे....! मित्रा तू
एकदमचं शॉल्ल्ल्ल्ल्ल्ल्लेट....!!!

**- संतोष नार्वेकर**

Best !!!

काळीज कापलसं मित्रा चरारा कापलसं....!

**- अभिषेक प्रभुदेसाई**

# --- बारा लाख वाचकांसाठी ई चळवळ ---

तीन वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना दिडशेहून अधिक ई पुस्तके विनामूल्य दिली. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना लोकांसमोर आणले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच आत्महत्या, दहशतवाद अशा विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीतासाठी संगीत कानसेनचे वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना उभारी दिली.

लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही अधिक जोमाने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. **आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल?** जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ लोकांची मेल आय डी पाठवा. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही **"ई साहित्य पाठीराखे"** म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

**तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?**

फ़क्त आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी खालील पत्त्यावर पाठवा.

**esahity@gmail.com**

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती पाठवून किंवा भलभलत्या मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

- अधिक माहितीसाठी –

**: संकेत स्थळ :**

**www.esahity.com**

**: फेसबुक :**

**https://www.facebook.com/esahity**

--------------------

ह्या ई पुस्तकातील सर्व कवितांचे हक्क कवीच्या स्वाधीन,तसेच ई पुस्तकात वापरण्यात आलेल्या सर्व चित्रांचे हक्क चित्रकाराच्या स्वाधीन.

--------------------